पोलीस अधीक्षक सातारा यांचे कार्यालय
जिल्हा विशेष शाखा, सातारा
दुरध्वनी क्रमांक ०२१६२- २३२२२५ , २३४२३१
Email- sp.satara@mahapolice.gov.in




## 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हा पोलीस सज्ज; नियम मोडणाऱ्यांवर होणार कडक कारवाई

वर्ष २०२५ ला निरोप देऊन आपण सर्वजण नवीन वर्ष २०२६ च्या स्वागतासाठी सज्ज आहोत. नवीन वर्षाचा हा उत्साह साजरा करताना आपल्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी सातारा जिल्हा पोलीस दलातर्फे खालील सज्ज झाले असुन खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

सातारा जिल्हयातील पांचगणी, महाबळेश्वर, वाई, कास ,बामणोली ,तापोळा, मेढा, कोयनानगर या पर्यटन स्थळांवरील विशेष लक्ष ठेवणेत येणार आहे. सातारा जिल्हयातील किल्ले आणि धरणे यांसारख्या संवेदनशील पर्यटन स्थळांवरील अतिरिक्त बंदोबस्त नेमणेत येणार आहे. याकरिता संपुर्ण सातारा जिल्हयात ५ उविपोअ, ११ पोनि , ७० सपोनि/पोउनि , १२०० पोलीस अंमलदार व ७०० गृहरक्षक नेमणेत येणार आहेत.तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडील ७ विशेष पथ के तयार करण्यात आलेली आहेत.

सातारा जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे हददीत मुख्य रस्ते , चेकपोस्ट व सातारा जिल्हयाचे सिमेवर नाकाबंदी पॉईंट नेमणेत येणार आहेत. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याकरीता जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेस ब्रेथ ॲनालायझर मशीन पुरविणेत आल्या असुन एकुण ३९ पथके तयार करण्यात आलेली आहेत.

प्रत्येक पोलीस ठाणे निहाय २ पथके हॉटेल, लॉजेस, धाबे तपासणी करिता नेमणेत आलेली आहेत.विशेषत: पांचगणी , महाबळेश्वर ,वाई,कास ,बामणोली, इ.पर्यटनस्थळाचे ठिकाणी जास्तीचे लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे.

गर्दीच्या ठिकाणी महिलांची छेडछाड रोखण्यासाठी आणि गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी साध्या वेशातील पोलिसांची पोलीस ठाणे निहाय पथके तयार करण्यात आलेली आहेत. उपविभाग निहाय ७ निर्भया पथकामार्फतही कारवाई करण्यात येणार आहे.

विहित वेळेपेक्षा जास्त काळ आणि मोठ्या आवाजात लाऊडस्पीकर लावणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी जिल्ह्यात 30 ध्वनीमापक पथके (Noise Level Meter Squads) तयार करण्यात आलेली आहेत.ध्वनी प्रदूषणाचे नियम मोडणाऱ्या आयोजकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

सातारा जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नवीन वर्षाचे स्वागत उत्साहात पण नियमांच्या चौकटीत राहून करावे. अफवांवर विश्वास ठेवू नका आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित '**डायल**112' या क्रमांकावर संपर्क साधावा.

**पोलीस अधीक्षक , सातारा**

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी सातारा
सर्व वृत्तप्रतिनिधी संपादक सातारा जिल्हा
सर्व इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रतिनिधी सातारा जिल्हा